मंगळवार दि.२५ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१९० किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# केंद्र सरकारने कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क हटवले: १ एप्रिल २०२५ पासून अंमलबजावणी

## राज्यातील लाखो कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना केंद्र सरकारने मोठा दिलासा दिला आहे. कांदा निर्यातीवरील वीस टक्के निर्यात शुल्क १ एप्रिल २०२५ पासून रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला केंद्र सरकारने घेतला आहे. या निर्णयाची अधिसूचना देखील जारी करण्यात आली आहे. यामुळे राज्यातील लाखो कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.गेल्या काही दिवसांपासून कांद्याचे भाव सातत्याने घसरत असल्यामुळे शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त होत होती. उन्हाळी कांदा बाजारात येणार असल्याने येत्या काळात आणखी भाव खाली जाण्याची भीती व्यक्त होत होती. मात्र आता केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवरील २० टक्के निर्यात शुल्क पूर्णपणे हटवले आहे. यामुळे कांदा निर्यातीचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे. राज्यात कांदा पिकाची लागवड जास्त झाली आहे व पोषक हवामान असल्याने उत्पादन जास्त होणार आहे. त्यामुळे कांद्याच्या भावात शेतकऱ्यांची कोंडी होऊ नये म्हणून कांदा पिकावरील २० टक्के निर्यात शुल्क हटवले जावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात होती. केंद्र सरकारच्या या निर्णयाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवी, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केंद्र सरकारचे आभार मानले आहेत.

केंद्र सरकारने कांद्यावरील २० टक्के निर्यात कर संपूर्णतः: मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. १ एप्रिल २०२५ पासून या निर्णयाची अंमलबजावणी होईल. लासलगाव आणि पिंपळगाव येथून मोठ्या प्रमाणात कांद्याची आवक होत आहे. या निर्णयामुळं महाराष्ट्रातील कांदा उत्पादकांना मोठा दिलासा



मिळणार आहे. हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेत महाराष्ट्रातील कांदा उत्पादकांना मोठा दिलासा दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शाह यांचा अत्यंत आभारी असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

या निर्णयाचे स्वागत करताना उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, केंद्र सरकारचा हा निर्णय राज्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. कांदा निर्यातीवर आकारण्यात येणारा २० टक्के निर्यात शुल्क रद्द केल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य दर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हा प्रश्न सुटावा यासाठी केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्याशी थेट संवाद साधून त्यांना याबाबत लक्ष घालण्याची विनंती केली होती. राज्यातील शेतकऱ्यांच्या अडचणी आणि त्यावरील तातडीने उपाययोजना करण्याची गरज लक्षात घेऊन त्यांनी पुढाकार घेत हा निर्णय घेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. राज्य शासन राज्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध असून, भविष्यातही शेतकरी हिताचे निर्णय घेतले जातील. असेही उपमुख्यमंत्री पवार यांनी नमूद केले आहे.कांदा निर्यातीवरील २०% शुल्क रद्द करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयामुळे महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केली आहे. कांद्याचे निर्यात शुल्क रद्द करण्याबाबत शासनाच्या वतीने वेळोवेळी पंतप्रधान त्याचप्रमाणे केंद्रीय सहकार मंत्र्यांना विनंती करण्यात आली होती. या निर्णयामुळे कांदा उत्पादकांना आता चांगला भाव मिळू शकेल असेही शिंदे यांनी म्हटले आहे.

# जिवनदीप बहुउद्देशीय शैक्षणिक सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून पक्षांना पाणपोईची सुविधा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा । इस्माईल महेबूब शेख**



दिनांक २० मार्च रोजी निलंगा येथे जागतिक चिमणी दिण जिवनदीप बहुउद्देशीय शैक्षणिक सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून पक्षांना पाणपोईची सुविधा करुन साजरा करण्यात आला. सध्या उन्हाळा ऋतू सुरू असल्याने, तसेच जागतीक तापमान वाढ, प्रदुशन वाढ, वृक्ष तोड यामुळे पक्षांचा अधिवास कमी होत चालला आहे. त्यांची संख्या कमी होत चालली आहे. पक्षांना पाणी, खाणे मिळणे अवघड झाले आहे. त्यांच्या राहण्याची, खाण्याची, पाण्याची व्यवस्था करने आवश्यक आहे. जीवनदिप बहुउद्देशीय शैक्षणिक सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून दर वर्षी पक्ष्यांना पाणी पिण्यासाठी मातीच्या यळणी, पाणपोई सुविधा केली जाते. सार्वजनिक समशान भूमी शांती वन येथे महाराजांच्या हस्ते, संगन बसव विरक्त मठ येथे संगन बसव महास्वामी जी यांच्या हस्ते, आर्य समाज मंदिर येथे समाजसेवक ॲडव्होकेट अजित शाहीर, सुजित शाहीर, शंकरअप्पा मठपती, माधव सुभेदार, नेताजी सुभेदार यांच्या हस्ते, डी के पाटील इंग्लिश स्कूल निलंगा येथे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ सुहासिनी पाटील मॅडम यांच्या हस्ते पक्षांना पाणपोई , मातीच्या यळणी झाडांना बांधण्यात आल्या. यावेळी जीवनदिप बहुउद्देशीय शैक्षणिक सेवाभावी संस्थेचे गुरुनाथ मोहोळकर, प्रल्हाद मोहोळकर उपस्थित होते. या उपक्रमासाठी डॉ.सतीश जाधव, सत्यजीत हिरास, प्रवीण मोहोळकर, हरिभाऊ टोंपे, विठ्ठल पाटील, परमेश्वर पाटील, सोमनाथ मोहोळकर, मल्लिनाथ मोहोळकर, गणेश मोहोळकर, श्रीराम कुंभार, ॲडव्होकेट हेमंत टोंपे यांचे सहकार्य लाभले.

# श्री.छत्रपती शिवाजी हायस्कूल सगरोळी येथे रांगोळी स्पर्धा संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सगरोळी । प्रतिनिधी**

सगरोळी येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल येथे *गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव अंतर्गत गांधी तीर्थ स्वच्छ शाळा, राज्यस्तरीय स्पर्धा २०२४-२०२५ रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. हायस्कूलच्या कला विभागातील ५० मुली व व २० मुलांनी सहभाग घेतला. या विद्यार्थ्यांतील स्वच्छता विषयक कल्पना रांगोळीतून मांडल्या. या स्पर्धेत इयत्ता सहावी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत प्रथम– श्रद्धा राजेश्वर कवडे द्वितीय– अनुष्का प्रभाकर नरवाडे तृतीय– कीर्ति बसवंत मुंगडे उत्तेजनार्थ– ओमकार संग्राम लष्करे या विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन केले. या स्पर्धेसाठी कलाशिक्षक नंदकुमार ओतारी व विठ्ठल हराळे सर तसेच गांधी परीक्षेचे समन्वयक कैलास कोदळे यांनी योग्य ते मार्गदर्शन केले. येथील शाळा विविध उपक्रम व स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष लक्ष देऊन शालेय उपक्रमांतून कला गुणाना वाव देण्यात येतो. या उपक्रमात सहभागी झालेल्या मुलामूलिंचे मुख्यध्यापक श्री संभाजी गायकवाड यांनी कौतुक केले.

# मुलींसह पित्याच्या वाढत्या अपेक्षा मुलाकडे शेती पाहिजे

## पण शेतकरी नवरा नको गं बाई!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

सध्याच्या मुलींची लग्न जुळवताना आपल्या जोडीदाराबद्दल असलेली इच्छा, आकांक्षा व अपेक्षा यात शेतकरी नवरा नको गं बाई...अशी असली तरी मुलीच्या वडिलांची इच्छा मात्र मुलाला शेत हवेच, असाच काहीसा अट्टाहास सध्या तेलग्न जुळवताना दिसून येत आहे.पुणे, मुंबईला नोकरी करणाऱ्या मुलांना दिवसेंदिवस प्राधान्य मिळत असल्याचे चित्र सध्या तरी दिसून येत आहे,

जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांची अवस्था मुलांचे विवाह जमत नसल्याने बिकट झाली आहे. सध्या प्रत्येक गावात बिन लग्नाच्या शेतकरी युवकांची व काही ठिकाणी नोकरी आहे,पण शेती नाही.अशी संख्या मोठी असल्याचे दिसून येत आहे,सध्याच्या काळात लग्नाची वय झालेले व जवळजवळ वय संपत चाललेले अनेक तरुण फक्त शहरातच नव्हे तर गावागावांत दिसत असून लग्नासाठी मुलींची शोधाशोध त्यांच्या पालक व त्यांच्या नातलगांकडून सुरू असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

मुला,मुलींच्या जन्मदरात विषमता याचे मूळ कारण असले तरी या गोष्टीला इतरही कारणे कारणीभूत आहेत. गेल्या पंचवीस–तीस वर्षांपूर्वी लोकांचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा होता. उत्तम शेती आणि दुय्यम नोकरी अशी परिस्थिती होती; मात्र अलीकडच्या काही वर्षांत वेगाने काळ बदलला.उत्तम नोकरी कनिष्ठ शेती अशी परिस्थिती निर्माण झाली.मुली म्हणजे परक्याचे धन,अशी मानसिकता झाली. त्यातून स्त्रीभ्रूणहत्या झाल्या आणि मुलींचा जन्मदर घटला.




### अल्पभूधारक कुटुंबात मुलगी देईनात

**नवरा मुलगा मुंबई–पुण्यात नोकरी करीत असल्यास त्याला स्वतः चे घर आहे काय? हे सुरुवातील पाहिले जाते. त्यानंतर त्याचा पगार त्या शहराच्या मानाने कसा आहे. हे देखील बघितल जाते. शिक्षित कुटुंबातील वुधपिता शक्यतो उच्च शिक्षित आणि मोठ्या शहरातील नोकरीवाला मुलगा शोधतात. दुसरीकडे ग्रामीण भागातील शेतकरी कुटुबातील मुलीचे वडिल आर्धा शेतीला प्राधान्य देतात.शेती समाधानकारक वाटल्यास मुलावे शिक्षणही बघितले जाते. शिवाय त्यांचा काही व्यवसाय असल्यास वधुपिता मुलगी देण्यास अनुकूल असतात.**

# राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस नांदेडच्या पाठपुराव्याला यश विद्यापीठाच्या परीक्षा अर्ज भरण्याच्या अंतिम तारखेत वाढ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । किरण पाटील वडजे**



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या मागणीला अखेर यश मिळाले असून परीक्षा आवेदन पत्र भरण्याच्या अंतिम तारखेत वाढ करण्यात आली आहे.विद्यार्थ्यांच्या हितासाठी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस (शरदचंद्र पवार) चे जिल्हाध्यक्ष फैसल सिद्दिकी यांनी विद्यापीठ प्रशासनाकडे तातडीने निवेदन पाठवले होते. त्यामध्ये एम.ए. प्रथम व द्वितीय वर्ष (एनईपी २०२०) चा निकाल जाहीर होण्यास झालेल्या विलंबामुळे विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा, अशी मागणी करण्यात आली होती.

विद्यापीठाने पूर्वी २५मार्च ही अंतिम तारीख निश्चित केली होती. मात्र, २४ मार्च रोजी एमकेसीएल एमए हिंदीचा निकाल जाहीर झाल्याने विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी फक्त एक दिवसाचा कालावधी मिळत होता. त्यामुळे अनेक विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली होती. राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या सततच्या पाठपुराव्यामुळे विद्यापीठाचे कुलगुरू मनोहर चासकर यांनी मागणीचा विचार करून अर्ज भरण्याच्या अंतिम तारखेत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा असून, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार हे विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी सदैव तत्पर राहील, असे जिल्हाध्यक्ष फैसल सिद्दिकी यांनी सांगितले.

# पुनर्वसन गावठाण विकास कामांसाठी २५ कोटी रुपयांचा निधी–आमदार राहुल कुल

## पुनर्वसन शेरा कमी करून भोगवटा वर्ग १ प्रमाणपत्राचे देखील वाटप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**




दौंड तालुक्यातील अनेक गावातील पुनर्वसन गावठाणसाठी सुमारे २५ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व पुनर्वसन झालेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी भोगवटा वर्ग १ केलेले प्रमाणपत्र आमदार राहुल कुल यांचे हस्ते वाटप करण्यात आले.यावेळी अनेक गावातील शेतकऱ्यांनी आमदार राहुल कुल यांचे विशेष आभार मानत त्यांच्या कामाचे कौतुक देखील केले. यावेळी प्रांताधिकारी मिनाज मुल्ला,तहसिलदार अरुण शेलार, नायब तहसीलदार तुषार बोरकर, भीमा पाटसचे व्हा.चेअरमन नामदेव नाना बारवकर,संचालक पंढरीनाथ पासलकर भाजपा तालुकाध्यक्ष हरिभाऊ ठोंबरे,यांच्यासह पुनर्वसन गावठाणातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सालगड्यासाठी गावोगावी सुरू आहे शोधा शोध मजुरांच्या वाढलेल्या अपेक्षांमुळे शेतकरी हैराण

## शेतकऱ्याच्या मालाला हमी भाव कमी शेतकरी आर्थिक अडचणीत त्याच बरोबर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात घट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

गुढीपाडवा आला की शेतकरी आपल्या शेतात काम करण्यासाठी सालगड्यांचा शोध घेत असतात. यासाठी गुढीपाडव्याच्या १५ ते २० दिवस अगोदरपासूनच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची सालगड्यांच्या शोधासाठी धावपळ सुरू असते.परंतु यंदा सालगड्यांचा भाव दीड लाखावर जाऊनही सालगडी मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तर अनेक शेतकरी नातेवाईकांच्या गावी जाऊन सालगडीचा शोध घेत आहे तर काही दूरध्वनीद्वारे पाव्हणं सालगडी मिळेल का हो? अशी भावनिक साद घालत आहे. गुढीपाडवा जवळ आला तरी सालगडी मिळत नसल्याने व त्यांचे पगार गगनाला भिडल्याने त्यातच आजची तरुण पिढी शेती व्यवसायापासून दूर राहत असल्याने आगामी काळात शेती व्यवसाय डोकेदुखी ठरणार असल्याचे चित्र राज्याच्या विविध ग्रामीण भागात दिसून येत आहे.

शेती मोठ्या प्रमाणात निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. गत काही वर्षापासून शेती करणे आव्हानात्मक झाले होते. पाऊस अत्यंत अल्प, नाहीतर बरसला की अति होत आहे. त्यात खरीप व रबी हंगामातील पीक काढणीला आले की अतिवृष्टीने नासाडी होत असल्याचे वास्तव आहे.

**मानसिकतेत झाला बदल**

सालगडी म्हणून गुंतून राहण्यापेक्षा अनेक जण बांधकाम, वीटभट्टी, ऊसतोडणी, मंदिर बांधकाम, बार अँड रेस्टॉरंटमध्ये कामगार म्हणून जातात. येथे अधिक कमाई होत असल्याने ग्रामीण भागातील शेतमजूर शहराकडे वळाले आहेत.

त्यामुळे सालगडी मिळणे सध्या शेतकऱ्यांसमोरील एक मोठे आव्हान ठरत आहे.

सालगडी मिळत नसल्याने शेतकरी आपली शेती बटाईने देण्यावर भर देत आहेत. या वर्षात गुढीपाडवा जवळ आला तरी सालगडी मिळत नसल्याने शेतकऱ्यांपुढे दुहेरी संकट उभे ठाकले आहे. अनेक शेतकरी सालगड्याच्या शोधात भटकत आहेत.

**सालगड्याचा पगार लाखावर**

शेतीतून मिळणारे उत्पन्न कमी आणि शेतीसाठी करावा लागणार खर्च अधिक, यामुळे शेतकरी दुहेरी अडचणीत सापडला आहे.

यंदा सालगड्याचा पगार एक लाख ते दीड लाखापर्यंत गेला आहे. लोहा तालुक्यातील बऱ्याच गावांमध्ये स्थानिक पातळीवर सालगडी मिळत नसल्याने इतर जिल्ह्यांतून सालगडी शोधून आणण्याचे काम शेतकऱ्यांना करावे लागत आहे.

# आळंदीतील वाय जंक्शन चौक बनलाय मृत्यूचा सापळा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची । इम्रान हकीम**

आळंदी येथील वाय जंक्शन चौकात सकाळी सात ते दहा या दरम्यान मोलमजुरी करणाऱ्या कामगारांच्या गर्दीमुळे मजूर अड्ड्यावर वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण झाला आहे.गर्दीच्या वेळी अपघात झाल्यास यास जबाबदार कोण? असा प्रश्न वाहन चालक,स्थानिक व्यावसायिक यांनी उपस्थित केला आहे. देहू फाटा येथील वाय जंक्शन चौकात सकाळी गवंडी,सुतार, प्लंबर,बिगारी महिला व पुरुष मजूर अड्ड्यावर थांबतात परंतु दुचाकी व चारचाकी वाहन चालकांना कामगारांच्या गर्दीमुळे जीव मुठीत धरून वाहने चालवावी लागतात एखादा अपघात झाल्यानंतर निष्पाप जीवाचा बळी गेल्यानंतर पोलीस प्रशासनाला खऱ्या अर्थाने जाग येईल का? या चौकात एस. टी.महामंडळाचे बसस्थानक असून तेथेही संध्याकाळच्या वेळेस खाजगी बसने महाराष्ट्रात जाणाऱ्या प्रवाशांची भाविकांची दररोज गर्दी होत आहे.दिघी आळंदी



वाहतूक शाखेने वाय जंक्शन या चौकात सकाळ संध्याकाळ गर्दीच्या वेळी वाहतूक पोलीसांची नेमणूक करावी अशी आग्रही मागणी जोर धरू लागली आहे.महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून गोरगरीब कामगार कामाच्या शोधात देवाच्या आळंदीला येतात परंतु कामगारांना थांबण्यासाठी सुरक्षित जागा नसल्यामुळे कामगारांचे अतोनात हाल होत आहेत .

# आदर्श विद्यालयाचा माजी विद्यार्थी स्नेह मेळावा उत्साहात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित आदर्श मराठी प्राथमिक विद्यामंदिर येथे इसवी सन २००० ते २००९ पर्यंतच्या इयत्ता चौथीच्या सर्व बॅचेसचा माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा रविवार २३ मार्च रोजी आदर्श विद्यामंदिर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी सर्व माजी विद्यार्थी मा जिजाऊ यांच्या राजवाड्यासमोर एकत्रित झाले.त्यानंतर मा जिजाऊंच्या प्रतिमेचे दर्शन घेऊन बँड पथकासह सर्व विद्यार्थ्यांना शोभायात्रासह शाळेत आणण्यात आले. शाळेत आल्यानंतर सर्व माजी विद्यार्थ्यांचे कुंकुम तिलक लावून स्वागत करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीत घेऊन उद्घाटन सत्राची सुरुवात करण्यात आली. यावेळी उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी मा. श्री.विशालराव मीनासे,संचालक शिक्षण




प्रसारक मंडळ, चिखली हे होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणून मा.श्री.अरविंदजी शिंगणे संचालक शिक्षण प्रसारक मंडळ चिखली हे होते.तसेच शाळेचे स्थानिक सल्लागार श्री प्रकाशराव वायकोस ,श्री छगनदादा मेहेत्रे, श्री काशिनाथजी भालेराव, श्री तुळशीदासजी चौधरी, श्री दिलीपभाऊ काळे,श्री शिवप्रसादभाऊ ठाकरे,श्री रामभाऊ आढाव, सौ.ममताताई ठाकरे यांच्यासह सेवानिवृत्त शिक्षक श्री विश्वनाथजी मुंढे, श्री अंकुशराव वनवे, श्री दीपक मगर व शाळेचे मुख्याध्यापक श्री सुभाष मोरे,ज्येष्ठ शिक्षक श्री संजय भुतेकर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. उद्घाटन सत्रामध्ये सर्वप्रथम शाळेचे मुख्याध्यापक श्री.एस.टी.मोरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. दुसऱ्या सत्रामध्ये इसवी सन १९९९ ते २००० पासून ते २००८ - ०९ अशा बॅचनिहाय विद्यार्थ्यांचे चर्चासत्र घेण्यात आले. यामध्ये वर्गातील विद्यार्थ्यांचा परिचय करून घेतला तसेच त्यांची सद्यस्थिती,कार्यरत असलेले पद/ दायित्व, कौटुंबिक स्थिती याबद्दल माहिती घेतली व जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला. त्यानंतर शाळेत सर्वांची भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. सदर मेळाव्यात एकूण १५५ विद्यार्थी उपस्थित होते.त्यामध्ये काही शासकीय अधिकारी, डॉक्टर, इंजिनिअर, वकील, उद्योजक म्हणून कार्यरत आहेत.शेवटच्या समारोपीय सत्रामध्ये शाळेतील माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करत लहानपणीच्या शाळेतील आठवणींना उजाळा दिला व शाळेच्या प्रगतीसाठी व सहकार्यासाठी आम्ही नेहमी तत्पर राहू असेही त्यावेळी त्यांनी आपले मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.के.एस.गोरे मॅडम यांनी केले, तर आभार जे बी मानेमॅडम यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी यांनी परिश्रम घेतले.

# जागतिक क्षयरोग दिन आणि टीबी मुक्त ग्रा.पं. गौरव सोहळा उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद पा.मोरे**

जागतिक क्षयरोग दिनानिमित्त २४मार्च २०२५ रोजी वर्षभरात, निकषाच्या आधारावर टीबी मुक्त ग्रामपंचायत करण्यासाठी परिश्रम घेतलेल्या १६ तालुक्यातील २४८ पैकी ६७ ग्रामपंचायती रौप्य पदक स्मृतीचिन्हास पात्र ठरल्या आहेत. या ग्रामपंचायतचे सरपंच, ग्रामसेवक, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांचा गौरव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते महात्मा गांधी स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र पुष्पगुच्छ देवून गौरव करण्यात आला.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( पंचायत ) मंजुषा कापसे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हिरानी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाभाऊ बुट्टे,



अर्धापूर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विद्या झिने , जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. बदीउद्दीन, जागतिक आरोग्य संघटनेच्या सल्लागार डॉ. सम्यक खैरे यांची उपस्थिती होती. या ग्रामपंचायती मागील वर्षीही ब्रॉंझ स्मृती चिन्हाने गौरविल्या गेल्या होत्या. मागच्या वर्षातील ८६ ग्रामपंचायतीपैकी ६७ ग्रामपंचायती पुन्हा टीबी मुक्त ठरल्याने या ग्रामपंचायतींना सिल्वर स्मृतीचिन्ह प्रदान करण्यात आले.जनसामान्यांमध्ये क्षयरोगाविषयी जनजागृती करून , क्षयरुग्ण शोधून यांना नियमित औषधोपचार देत लवकरात लवकर क्षयमुक्त करावे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी केले. यानंतर अप्पर जिल्हाधिकारी राम बोरगावकर यांनी क्षयरुग्णांनी नियमित औषधोपचार घेऊन रोगमुक्त व्हावे असे आवाहन केले. यासोबतच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड आदींची समयोचित भाषणे झाली.


# आज होणाऱ्या नांदेडच्या बुद्धगया आंदोलनात मुदखेड तालुक्यातील शेकडोच्या संख्येने बौद्ध अनुयायी सहभागी होणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुदखेड । सदानंद शिंदे**

बौदयतरांच्या ताब्यात असलेले विहार राज्यातील महाबोधी महाविहार बौद्ध भिक्खु आणि बौद्ध धर्मीय यांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी नांदेड येथे आज २५ मार्च रोजी महामोर्च्याचे आयोजन करण्यात आले आहे. लाखो अनुयायी या महामोर्च्यात सहभागी होणार आहेत. नांदेड जिल्ह्यातील समस्त भिक्खु संघ, भारतीय बौद्ध महासभा,समता सैनिक दल आणि जिल्ह्यातील विविध सामाजिक, राजकीय संघटनानी या महामोर्च्याचे आयोजन केलेलं आहे. बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बुद्धविहार गेली अनेक वर्षांपासून बौदयतरांच्या ताब्यात आहे. विशेषतः हिंदू धार्मियांनी बौद्धविहाराच्या व्यवस्थापननावर ताबा घेऊन मनमानी चालवली असून बुद्धिस्ट टेम्पल ॲक्ट १९४९ नुसार हा ताबा असल्यामुळे बौद्ध धर्मीय भिक्खु आणि बौध्द अनुयायी यांच्या न्याय हक्कावर गदा आणली आहे. त्यामुळे सदर हा कायदा रद्द करण्याच्या मागणीसाठी भारतभर बौद्ध भिक्खु आणि अनुयायी यांनी व्यापक आंदोलन छेडले आहे. बुद्धविहार मुक्ती आंदोलनाच्या समर्थनार्थ जिल्ह्यात मुक्ती आंदोलन महामोर्च्या आज आयोजित करण्यात आला आहे.त्या मोर्च्यात मुदखेड तालुक्यातील बौद्ध अनुयायी मोठ्या संख्येने सामील होणार आहेत.नांदेडच्या कृषी उत्पन्न बाजार समिती मैदान, नांदेड येथे आज दुपारी १२ वाजता जिल्ह्यातील लाखो च्या संख्येने बौद्ध अनुयायीचा जमाव सहभागी होणार आहे. नवा मोंढा मैदान येथून महामोर्चाची सुरुवात होणार असून नियोजित भगवान बुद्ध पुतळा, महात्मा फुले पुतळा, शिवाजीनगर, कलामंदिर, वजीराबाद चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नांदेड जिल्हाधिकारी कार्यालय असा महामोर्चाचा मार्ग असणार आहे महामोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणी पोहचल्या नंतर महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन महामोर्च्या आयोजकांच्या वतीने जिल्हाधिकारी नांदेड यांना मागणीचे निवेदन देण्यात येणार आहे. मुदखेड तालुक्यातील बौद्ध अनुयायी मोठ्या संख्येने सहभागी राहणार आहेत.

**दि:२४ मार्च रोजी. जिल्हा अधिकारी कार्यालय नांदेड येथे जागतीक क्षयरोग दिनानिमित गौरव सोहळा साजरा करण्यात आला. महाराष्ट्र राज्यातून नांदेड जिल्हा प्रथम क्रमांकमावर आलेला आहे. त्या मध्ये देगलूर तालुक्याचे एक्स रे चे काम दुसऱ्या क्रमांकावर असल्यामुळे मा.डॉ.देवणीकर साहेब उपजिल्हा रुग्णालय देगलुर वैद्यकीय अधीक्षक, एक्स रे प्रमुख गोपाळ बिडवई ,टि.बि.तपासणीदार अनिता आसनेवाड यांना प्रशस्ती पत्र देवून गौरविण्यात आले आहे.( छाया - बाजीराव पाटील )**




# बौद्धगया येथील महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी माहूर येथील धम्मबांधवांचे निवेदन

## माहूर तहसिलदारामार्फत महामहीम राष्ट्रपतींकडे केली मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । प्रतिनिधी**

संपुर्ण जागातील बौद्ध अनुयायांचे श्रद्धास्थान असलेल्या बौद्धगया येथील 'महाबोधी महाविहार' यावरील बौद्धेत्तरांचा ताबा काढून बौद्धांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी माहूर येथील धम्मबांधवांनी आज दि. २४ मार्च रोजी माहूर तहसिलदारामार्फत महामहीम राष्ट्रपतींकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली असून संपुर्ण भारतासह जगभरातून होत असलेल्या या मागणीला माहूर तालुक्यातील बौद्ध अनुयांयांचा देखील पाठींबा असल्याचे निवेदनातून सांगितले आहे...

भारताच्या महामहीम राष्ट्रपती महोदया यांना तहसीलदार माहूर मार्फत दिलेल्या निवेदनात नमूद बाबींप्रमाणे.. संपुर्ण जगातील बौद्ध अनुयायांचे श्रद्धास्थान असलेले बौद्धगया येथील 'महाबोधी महाविहार' सन १९४९ च्या कायद्यानुसार बौद्धेतरांच्या ताब्यात असून हे महाविहार इतरांच्या ताब्यातून मुक्त करून बौद्ध भिक्कू संघ व बौद्धांच्या ताब्यात घेण्यासाठी ऐतिहासिक महाविहार मुक्ती आंदोलन सुरु आहे... तर 'महाबोधी महाविहार' हे युनेस्को नुसार विश्वधरोहर असून सन १९४९ मंदिर कायद्यानुसार नुसार बौद्धेतरांच्या ताब्यात असल्याने हा संपूर्ण जगभरातील बौद्ध अनुयायी



बांधवावर अन्याय आहे.... त्यामुळे संपुर्ण भारतभर पेटलेल्या या आंदोलनाला माहूर ता. जि.नांदेड महाराष्ट्र येथील बौद्ध अनुयायी सक्रीय पाठिंबा देत असून महाबोधी महाविहार बाबत करण्यात आलेला सन १९४९ चा मंदिर ॲक्ट रद्द करून पूर्णपणे बौद्ध भिक्कू संघ व बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे.. अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आले आहे.निवेदनावर प्रामुख्याने भिक्कूणी आर्याजी खेमा यांच्यासह सर्वधर्मीय विवाह मेळाव्याच्या निमित्ताने संपुर्ण महाराष्ट्रभर आपली ख्याती निर्माण केलेले पडसा येथे मागील दोन वर्षापर्यंत सुरू असलेल्या सर्वधर्मीय विवाह मेळाव्याचे सर्वेसर्वा प्रकाश गायकवाड, डॉ. झनक मानकर, मनोज किर्तने, रेणूकादास वानखेडे, विजय भगत, सिद्धार्थ तामगाडगे, आकाश कांबळे, राजेश मगरे, प्रविण बरडे, विक्रांत भगत, प्रतिक कांबळे, आदेश लांडगे, गौतम खडसे, अमृत जगताप, सुशिल रणवीर, सिद्धार्थ भवरे, त्रिशरण आठवले, धम्मपाल मुनेश्वर, हिरामण वाघमारे, संजय मानकर, दिपक मुनेश्वर, देवानंद भालेराव शे. रफीक शे. अली. दिपक कांबळे, शामराव राऊत, समाधान कांबळे तसेच गणेश खडसे यांच्यासह अनेकांच्या स्वाक्ष-या आहेत.

# डी विभाग ग्रँण्टरोड जिल्ह्यात जागतिक क्षय रोग दिन उत्साहात साजरा; एकच ब्रीद वाक्य टीबी हारेगा देश जितेंगा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई । प्रतिनिधी**




जागतिक क्षयरोग निर्मूलन दिन जगभरात आजचा दिवस म्हणजे २४ मार्च जागतिक क्षयरोग दिन (World Tuberculosis Day) म्हणून साजरा केला जातो. क्षयरोग अर्थात टीबी बद्दल जनजागृती वाढवण्यासाठी आणि या रोगाचा प्रसार रोखण्यासाठी जनजागृती केली जाते. १८८२ मध्ये डॉ. रॉबर्ट कोच यांनी क्षयरोगला (टीबी) कारणीभूत असलेल्या जीवाणूचा शोध लावला. आणि त्यानंतर जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) २४ मार्च हा दिवस जागतिक क्षयरोग दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. क्षयरोग (टीबी) बद्दल लोकांमध्ये जागरूकता वाढवणे आणि या रोगाच्या गंभीर परिणामांबद्दल माहिती देण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन आजच्या दिवशी केले जाते. क्षयरोग लवकर ओळखणे आणि त्यावर योग्य उपचार घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर त्याचा प्रसार रोखण्यासाठी उपाययोजना करणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर लक्ष केंद्रित करायला हवे याबद्दल माहिती देताना डॉ नितीन महाजन ग्रँण्टरोड जिल्हा क्षयरोग अधिकारी यांनी रॅली ची आयोजन केले व रॅली मध्ये विद्यार्थी नर्सिंग स्टुडन्ट, आरोग्यसेविका अशावर्कर व टीबी मध्ये कार्यरत स्टाफ यांनी सहभाग घेऊन रॅली मधून क्षयरोग जनजागृती चा संदेश दिला व क्षय रोगाला संपवण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले त्यानिमित्ताने स्ट्रीट प्ले व पारंपरिक लेझीम चे आयोजन करण्यात आले क्षय रोगाला संपवण्याची शपथ घेण्यात आली टीबी हारेगा देश जितेंगा या ब्रीद वाक्याने ग्रँण्टरोड जिल्ह्यात आवाज दुमदूमला क्षय रोगाबद्दल माहिती तपशील डॉ नितीन महाजन यांच्याकडून मिळाला १८व्या शतकाच्या उत्तरार्धात जगभरात क्षय रोगाच्या जागतिक साथीने थैमान घातले होते. २४ मार्च,१८८२ रोजी जर्मनीमधील 'बर्लिन इन्स्टिट्यूट ऑफ हायजीन' या प्रयोगशाळेत, अनेक विद्वान शास्त्रज्ञांसमोर डॉ. रॉबर्ट कॉक याने क्षय रोगाचे कारण असलेला जीवाणू शोधून काढल्याची माहिती दिली. तेव्हापासून त्याला, म्हणजे क्षय रोगाला 'कॉक्स डिसीज' असे नाव दिले गेले. क्षय रोगाच्या घातक जैविक प्रसारामुळे होणाऱ्या समाज घटकावरील परिणामांचे कारण असणारा जीवाणू सर्वांसमोर आला आणि युरोप-अमेरिकेसह इतर अविकसित देशांनाही या घटक जीवाणूंचे निदान झाल्यामुळे तो बरा होण्याची आशा निर्माण झाली.

१९८२ मध्ये रॉबर्ट कॉकने शोध लावल्यानंतर बरोबर १०० वर्षांनी जागतिक क्षयरोग आणि फुफ्फुसरोग संघटनेने, २४ मार्च हा दिवस अधिकृतरीत्या 'जागतिक क्षयरोग दिवस' म्हणून घोषित केला. त्यावर्षी जागतिक आरोग्य संघटनेने क्षय रोगाला हरवा : आता आणि कायमस्वरूपी असे त्यावर्षीचे विषय शीर्षक (theme) प्रसारित केले. अविकसित व गरीब राष्ट्रांबरोबर संपन्न आणि विकसित देशांनाही ही समस्या भेडसावत होती. १९९८ साली २०० स्वयंसेवी संघटनांनी जागतिक क्षय रोग दिनी लंडन येथे बैठक घेतली. २२ क्षयरोगग्रसित देशांची यादी बनवली गेली व त्याबद्दल सर्वत्र जागरूकता अभियान सुरू केले. २४ मार्च या दिवशी 'डीओटीएस (DOTS)' म्हणजे 'डायरेक्टली ऑब्झर्व्हड थेरपी शॉर्ट कोर्स' ही चिकित्सा प्रणाली, जागतिक आरोग्य संघटनेने भारतातील हैदराबादच्या महावीर हॉस्पिटलमध्ये सर्वप्रथम लागू केली. तोवर जगभरातील एकाही देशाकडे क्षयरोगाशी लढणारी प्रतिकारशक्ती योग्य मात्रेत अस्तित्वात नव्हती. क्षयरोगाची बीसीजी ही लस लहान मुलांमधील क्षय रोगाचा काही अंशी प्रतिबंध करते; पण उपचार हे ताकतीने करावे लागतात. आपल्याला केवळ श्वासमार्ग किंवा फुप्फुसाचा क्षयरोग माहिती आहे. पण क्षयरोग हा शरीरातील अनेक अवयवांना ग्रासतो. त्यात यकृत, प्लिहा, हाडे, मणके, त्वचा, आतडी, मेंदू हे अवयवही येतात. यांचा क्षयरोग हा अधिक घातक स्वरूपाचा समजला जातो. योग्य वेळी निदान आणि ९ किंवा ११ महिन्यांची डॉट्स चिकित्सा प्रणाली अधिक उपयोगी ठरते. जगभरातील क्षयरुग्णांना दिलासा देणारी औषधे या क्षयरोग दिनीच बाजारात आली. आणि क्षय रुग्णांचा प्रवास सुकर झाला. लस आणि प्रभावी उपचाराच्या माध्यमातून जरी क्षयरोग आता पूर्णतः बरा होत असला, तरी तो अजूनही काही विकसनशील आणि अविकसित देशांमध्ये बऱ्याच प्रमाणात दिसून येतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या उद्दिष्टानुसार अजूनही क्षयरोगाचे निर्मूलन पूर्णतः झालेले नाही. त्यासाठी जागतिक पातळीवर आजही प्रयत्न चालू आहेत. जागतिक क्षयरोग दिनी, असे अनेक नवनवीन उपाय आणि अशा नवनवीन संकल्पना राबविल्या जातात. उपस्थित कर्मचारी व आरोग्य अधिकारी डॉ नितीन महाजन, संदीप खरात ,आरती म्हात्रे,यशश्री सावंत, शशांक बांदकर, राम यादव, निलेश म्हात्रे, जीवेश ढवळे, श्रीराम केदार, हरीश हिवाळे,अरबाज देशमुख यांनी रॅली यशस्वी केली व जनजागृती चा संदेश लोकांपर्यंत पोहचवला.

# चिमण्याचे संरक्षण व संवर्धन करणे काळाची गरज-प्राचार्य व्ही.एन.सादुडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**



तेजमल गांधी विद्यालय ब्राह्मणगाव येथे जागतिक चिमणी दिवस संपन्न झाला. चिमणीचे जीवन कार्य आणि त्यांचा चालत आलेला प्रवास मानवासाठी कसा उपयुक्त आहे आपला प्रास्ताविकेतून एस . के . माने यांनी व्यक्त केला. तेजमल गांधी विद्यालयातील शिक्षक श्री आकाश गरुडे, अरविंद माने, दत्तराव कदम, विद्यार्थिनी समृद्धी रंधे, स्वाती गोरेवाड यांनी पक्षाबद्दल आपले विचार व्यक्त केले.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी चिमण्यांच्या जीवनशैलीबद्दल माहिती घेतली आणि त्यांचे संरक्षण करण्याचे महत्त्व समजावून घेतले. विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि सादरीकरणांद्वारे चिमण्यांच्या भूमिकेवर प्रकाश टाकण्यात आला. चिमण्यांच्या संवर्धनासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले आणि पर्यावरण संरक्षणाच्या महत्वावर भर दिला.आज चिमण्यांची संख्या कमी होत चालली आहे. खरं म्हणजे भारतात सगळीकडे सर्वात जास्त संख्येने सापडणारा, विणीचा हंगाम वर्षभर असू शकणारा, माणसाच्या जवळपास राहणारा आणि त्यामुळे नेहमी दिसणारा पक्षी अशी चिमणीची ओळख आहे. परंतु दिवसेंदिवस होत चालल्या बदलामुळे आता चिमण्यांच्या वास्तव्याला धोका निर्माण झाला आहे. यासाठी जागरूकता निर्माण करण्यासाठी २० मार्च हा दिवस 'जागतिक चिमणी दिवस' म्हणून साजरा केला जातोय चिमणीचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी उन्हाळ्या मध्येआपल्या आजूबाजूला पक्षांसाठी पाण्याची व्यवस्था करावी. उरलेले अन्नधान्य पक्षासाठी ठेवावे .पावसाळ्यामध्ये झाडे लावावी व त्याचे संरक्षण करावे असे उद्गार कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य व्ही एन सादुडे सर यांनी व्यक्त केले या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून आकाश गरुडे, संतोष माने दत्तराव कदम , आनंद कांबळे, अरविंद रावते, संदिप कदम, उपस्थित होते. संस्थेचे चेअरमन डॉ. विजयराव माने साहेब यांच्या नेतृत्वात दरवर्षी हजारो झाडे लावून चिमणी सारख्या पक्षाचे संरक्षण व संवर्धन केले जाते असे उद्गार या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणारे पांडुरंग माने सर यांनी व्यक्त केले तर आभार आनंद कांबळे सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थ्यांनी सहकार्य केले त्याबद्दल श्री अशोक शिरफुले यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

# शेलगावची शतकोत्तर नाट्यपरंपरा मागील शंभरपेक्षा जास्त वर्षापासून शेलगांव ता.अर्धापूर इथं दरवर्षी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**



यात्रेनिमित्त गावातील कलाकार मंडळी तीन अंकी नाटकाचे सादरीकरण करतात. दोन ते तीन महिन्यापूर्वीपासून नाटकाची कथा निवडून तालमीला सुरुवात केली जाते. यातील सर्व कलाकार गावातील असतात... या कलावंतातील प्रत्येक जण आपापले दैनंदिन कामकाज सांभाळत दररोज रात्री आत्माराम महाराज संस्थानच्या मठामध्ये तालमीसाठी येतो. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे हिंदू हिंदू धर्म युवकासोबत मुस्लिम तरुणही या नाटकात भूमिका साकारत आलेले आहेत आहेत मागील ५० वर्षापासून बालाजी नामदेव राजेगोरे या कलावंतांना दिग्दर्शक करत आहेत शंभर पेक्षा जास्त वर्षांची परंपरा आमच्या गावातील युवक कुठलाही मोबदला ना कसला आर्थिक लाभ तरीही आवरितपणे ही नाटकाची परंपरा माझ्या गावचा युवक जोपासतो हे आवर्जून सांगावसं वाटतं ना कुठे कुठल्या टिकिट ना कुठली पावती रसिकांना फाडावी लागते तरीही या कलेश्वर खुश होऊन गर्दी प्रेक्षक कलावंतांना प्रोत्साहन म्हणून शेकडो रुपये बक्षीस देतात दरवर्षी या बशी बक्षीसांची रक्कम लाखाच्या आसपास असते या नाटकांना गावातील तसेच पंचकोशीतील इतर गावाहून येणारा प्रेक्षक वर्ग हजेरी लावतो शेलगावातील रंगभूमीचा इतिहास मोठा रंजक आहे

# तुकाराम पटणे यांच निधन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



कंधार तालुक्यातील फुलवळ येथील तुकाराम पटणे वय ४९ वर्ष रा.फुलवळ यांचे दि.२३ मार्च रोज रविवारी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर रविवार दि.२३ मार्च रोजी सायंकाळी ८ वाजता फुलवळ ता.कंधार येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात्य पत्नी,दोन मुलं,आई,असा परिवार आहे.ते शासकीय गुत्तेदार माधवराव पटणे यांचे पुतणे तर नामदेवराव पटणे, हणमंत पटणे यांचे चुलत भाऊ होते.

# उपविभागीय अधिकारी कंधार व तहसीलदार लोहा यांच्या अवैध वाळू उपसा विरोधी पथकाने २३५ ब्रास वाळू साठा केला जप्त

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मारतळा । भास्कर ढेपे**



मारतळा येथून जवळ असलेल्या नांदगाव, चिंचोली येथील गोदावरी नदीपात्रातील वाळू माफियांकडून अवैध वाळू उपसा करुन साठवून ठेवलेली २३५ ब्रास वाळू कंधार उपविभागीय अधिकारी कंधार व लोहा तहसीलदार लोहा यांच्या महसूल पथकाने जप्त केली आहे. सदर वाळूसाठा हा येळी येथील शासकीय डेपोत जमा करण्यात आला आहे. महसूल विभागाची ही कारवाई मागील ३६ तासापासून सुरू आहे. मात्र जागोजागी वाळूचे साठे वाळू माफियांनी केले त्याचे काय करणार ? असा सवाल पर्यावरण प्रेमींकडून व्यक्त केला जात आहे. कंधारच्या उपविभागीय अधिकारी व लोहाचे तहसीलदार यांच्या अवैध वाळू उपसा विरोधी पथकाने कारवाई केली. चिंचोली व येळी नदीपात्रातून वाळू माफियांकडून अवैध वाळू उपसा करुन नांदगाव, चिंचोली येथे वाळूचा साठा मोठ्याप्रमाणात करून ठेवल्याची माहिती महसूल विभागास मिळाली. त्यावरून शुक्रवारी वेगवेगळ्या ठिकाणाहून ४७ हायवा टिप्पर वाळू जप्त केली. ३६ तास महसूल पथकाने परिश्रम घेऊन ही कारवाई केली. या कारवाईत मंडळ अधिकारी चंद्रशेखर सहारे, दत्ता कठारे, ग्राम महसूल अधिकारी मोतीराम पवार, लक्ष्मण गोधणे, संतोष अस्कुलकर, संजय मेहूणकर, गौरव कासेवाड, निखिल सुंदरगीरवार, राजू इंगळे, परशुराम जाधव, संतोष जाधव, बालाजी एकाडे, रायाजी नितीन, जी. ए. लाडेकर यांचा समावेश होता. दरम्यान, चिंचोली, येळी, कामळज येथील गोदावरी नदी पात्रातून वाळू माफियांकडून अवैध वाळू उपसा करून वेगवेगळ्या ठिकाणी आणखी मोठ्या प्रमाणात साठेबाजी केली आहे. त्या वाळू साठ्यावर जप्तीची कारवाई कधी होणार? असा सवाल पर्यावरण प्रेमींनी केला आहे.

# के.वाय.पटवेकर यांची डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या मराठवाडा विभाग सहसचिवपदी नियुक्ती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कासार शिरशी । फिरोज जागीरदार**



डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागाच्या सहसचिवपदी निलंगा तालुक्यातील निटूर येथील श्री. के. वाय. पटवेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत कार्यरत राहील.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी ही घोषणा केली असून, डिजिटल मीडिया क्षेत्रातील पत्रकारांसाठी कार्य करण्याच्या त्यांच्या अनुभव व योगदानाचा विचार करून त्यांना ही जबाबदारी देण्यात आली आहे. श्री. पटवेकर हे डिजिटल माध्यमाच्या सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून कार्यरत आहेत आणि पत्रकारितेच्या उच्च मूल्यांची जोपासना करत आहेत.

या नियुक्तीनंतर श्री. पटवेकर यांच्यावर विविध जबाबदाऱ्या येणार असून, डिजिटल मीडिया क्षेत्रातील हित जोपासण्यासाठी आणि पत्रकारांसाठी कार्य करण्याचा त्यांनी संकल्प व्यक्त केला आहे. त्यांच्या निवडीबद्दल ज्येष्ठ पत्रकार संजय जेवरीकर, दीपरत्न निलंगेकर, सतीश तांदळे, लिंबराज पन्हाळकर, बालाजी उबाळे, नेताजी जाधव, किरण कुलकर्णी, जावेद मुजावर, सलीम पठाण, फिरोज जागीरदार यांच्यासह पत्रकार मित्रपरिवार व हितचिंतकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# शेतकऱ्यांसाठी साम्राज्य उभे करण्यासाठी हिम्मत दाखवणारे जिगरबाज नेते म्हणजे कवळें गुरुजी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील**



सामान्य कुटुंबातील अष्टपैलू व्यक्तिमत्व कवळे गुरुजी होय शेतकऱ्यांसाठी साम्राज्य उभे करण्यासाठी हिंमत दाखवतो तोच जिगरबाज असतो.उद्योगरत्न मारोतराव पाटील कवळे गुरुजी म्हटले की निष्कलंक चारित्र्य संपन्न चांगलें विचार असणारे व्यक्तिमत्त्व,दुसऱ्यांमध्ये सामर्थ्य निर्माण करून यशाचा पाऊल खुणा दाखवणारा देवमाणूस म्हणजे मारोतराव पाटील कवळे गुरुजी आहेत.सिंधी गावच्या या खडकाळ जमिनीवर सहा महिन्यात कारखाना उभारून परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्याचे काम लोकनेते मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी केले हे परिसरातील शेतकऱ्यांना विसरता येणार नाही ,उघड्या डोळ्याने नांदेड जिल्हाच काय संपूर्ण मराठवाड्यातील आठ जिल्हे पाहत आहेत. बंद अवस्थेतील कारखाना चालु करून तेथेच तिसरा नव्याने कारखाना उभारून याही भागातील नव्हे तर नांदेड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्याचे काम केले आहे . कवळे गुरुजी म्हणतात १४ महिन्याचे ऊसपीक असल्याने शेतकऱ्यांना शेती जोड व्यवसाय दुग्ध व्यवसाय इतर कोणत्याही व्यवसायाला प्राधान्य देतात. कै.व्हि.पि.के.पतसंस्थेच्या वतीने अल्पदरात कर्ज वाटप करून अनेकांना व्यवसाय करणाऱ्यांसाठी भांडवल पुरवठा करतात.व्यवसायाची संकल्पना देतात म्हणूनच त्यांना देवमाणुस म्हणतात.चार कारखान्याचा ऊस दहा हजार मेट्रिक टन गाळप यशस्वी झाले आहे .

## विभक्त राहणा–या दांम्पत्यांचा संसार जुळला

# बिलोली न्यायालयातील राष्ट्रीय लोक अदालतीत ७९६ प्रकरणांचा निपटारा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । प्रतिनिधी**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या साह्याने बिलोली तालुका विधी सेवा समितीच्या वतीने शनिवार दि. २२ मार्च रोजी बिलोली चे जिल्हा न्यायधीश दिनेश कोठलीकर यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोक अदालतीत ४०१८ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ७९६ प्रकरणे सामोपचाराने मिटविण्यात आली असून यावेळी गेल्या दोन वर्षांपासून विभक्त राहणा–या एका दामत्यांचा पुन्हा संसार जुळविण्यात यश आले आहे.

प्रलंबित आलेले व न्यायालयीन लढाई पेक्षा बाहेरच कमी वेळेत प्रकरणांचा तडजोडीने निपटारा व्हावा यासाठी लोक अदालतीचे आयोजन





करण्यात येते. दि. २२ मार्च रोजी बिलोली येथील अती जिल्हा सत्र न्यायालयात बिलोली चे अति. जिल्हा सत्र न्यायाधीश दिनेश ए. कोठलीकर यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी न्या. ए. ए. के शेख, न्या व्ही. आय घोरपडे यांच्या उपस्थितीत सदरची लोक अदालत पार पडली. या लोक अदालतीत तालुका विधी सेवा समितीच्या वतीने ४०१८ विविध प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ७९६ प्रकरणे सामोपचाराने निकाली काढण्यात आली. निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणांमध्ये चार कोटी २१ लाख ३६ हजार ३५१ रूपयांची तडजोड करण्यात आली. तर न्या. ए ए के शेख यांच्या न्यायालयातील बायको नांदायला येण्यासाठी सचिन कुमार बिरादार यांनी दि. २८ एप्रिल २०२३ रोजी दाखल केलेल्या प्रकरणात न्या. शेख यांनी दोन्ही बाजुच्या लोकांना समजून सांगत राष्ट्रीय लोक अदालतीत प्रकरण निकाली काढण्यात आले. या प्रकरणात पॅनल विधिज्ञ अ‍ॅड. एन. एच येरावार व ड. मनोज आरळीकर यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. ऑनलाईन पद्धतीने तडजोड झालेल्या या प्रकरणातील पती सचिन कुमार बिरादार व पुजा बिरादार यांनी एकत्र आनंदी राहण्याचा निर्णय घेतला. बिलोली येथे पार पडलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीच्या यशस्वीतेसाठी अधिक्षक एम. डी होपळे,वरिष्ठ लिपीक संजय शेवाळे यांच्यासह न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# धर्माबाद शासकीय विश्रामगृहात भारतीय बौद्ध महासभेच्या तालुका कार्यकारिणीची निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । प्रकाश कुरेवाड**

भारतीय बौद्ध महासभेच्या धर्माबाद तालुका शाखेच्या कार्यकारिणीची निवड धर्माबाद येथील शासकीय विश्रामगृहात पार पडली. या वेळी विविध पदाधिकाऱ्यांची निवड करून नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.नवीन कार्यकारिणीत तालुका अध्यक्ष म्हणून कैलास अर्जुन डुमणे यांची निवड झाली असून, तालुका उपाध्यक्षपदी माधव विठ्ठलराव कांगठीकर यांची निवड झाली आहे. सदानंद विठ्ठलराव देवके यांना सचिवपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.याशिवाय, किशोर भीमराव बनसोडे, संजय तुळशीराम कदम,



गणेश शंकराव वाघमारे, बालाजी लक्ष्मण घायाळ, यादव राघोबा शेळके, नारायण गोविंद सोनटक्के, भीमराव गणपती वाघमारे, आनंदा संग्राम रामटक्के, शेषराव रायबा सातेलू, भगवान भीमराव कदम, जे. लिंबू रामदेव वाघमारे, रविकुमार गंगाधरराव वाघमारे, गौतम ज्ञानोबा वाघमारे, राज्यपाल मनोहर सोनटक्के आणि मनोहर लक्ष्मण लोकडे यांचीही विविध पदांवर निवड करण्यात आली आहे.या कार्यकारिणीच्या निवडीसाठी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष गणपत गायकवाड, जिल्हा सरचिटणीस दामोदर सरकटे, जिल्हा कोषाध्यक्ष सुभाष नरवाडे, कार्य सचिव साने. भालेराव आणि संघटन प्रभारी सुभाष कांबळे यांनी विशेष योगदान दिले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष गणपत गायकवाड होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दामोदर सरकटे, सुभाष नरवाडे, सुभाष कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाला वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष गौतम देवके, सल्लागार जे. के. जोधळे, मधुकर वाघमारे आणि चांदोबा वाघमारे हे देखील उपस्थित होते. तसेच पत्रकार एकता महासंघ भारत जारीकोट प्रतिनिधी नमिता संभाजी डुमणे यांचीही विशेष उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या शेवटी नूतन कार्यकारिणीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचा निर्धार केला. तसेच समाजातील वंचित, उपेक्षित घटकांसाठी कार्यरत राहण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला.

# एम.जी.एम.कॉलेज नांदेड येथे नेत्र तपासणी शिबीर संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील**

एम.जी.एम.कॉलेज ऑफ कंप्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्या एन.एस.एस.युनिटने लायन्स क्लब नांदेडच्या सहकार्याने २० मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपासून संध्याकाळी ५ वाजेपर्यंत विद्यार्थ्यांसाठी आणि कर्मचारी सदस्यांसाठी नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन केले होते. लायन्स नेत्र रुग्णालयाच्या अत्याधुनिक साधनसामग्रीसह डॉ. सुप्रिया भंडारे, श्री. अमोल पवळे आणि राम शिंदे (दोन्ही ऑप्टोमेट्रिस्ट) यांच्या पथकाने १२५ हून अधिक विद्यार्थ्यांची आणि कर्मचार्यांची डोळ्यांची तपासणी केली.

हे शिबिर डॉ. सुनिल डाहाळे एन.एस.एस.समन्वयक आणि प्राध्यापक सुशांत बोलवार यांच्या समन्वयाने आयोजित करण्यात आली होती.या आयोजना बाबत महात्मा गांधी मिशन संस्थेचे अध्यक्ष श्री.कमल किशोर कदम,




अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. गीता लाटकर, महात्मा गांधी मिशन कॉलेज ऑफ ऑफ कंप्युटर सायन्स आणि आयटीचे प्राचार्य डॉ. शिरीष कोटगीरे, उपप्राचार्या डॉ. कांचन नांदेडकर, बायोइन्फॉर्मेटिक्स विभागाचे प्रमुख डॉ. चेरकर, बीसीए विभागाच्या प्रमुख डॉ. स्मिता भोपी, बायोटेक्नोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. गोंड धनंजय बायोटेक्नॉलॉजी आणि बायोइन्फॉर्मेटिक्स विभागाचे प्रमुख डॉ. मकरंद चेरेकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# खानवटे-राजेगाव रस्ता दोन दिवसात उखडला

## अधिकारी करतात ठेकेदाराचे घर भरण्याचे काम?

लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

दौंड तालुक्याच्या पूर्व भागातील आणि पुणे जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावरील खानवटे– राजेगाव हा अडीच किलोमीटर चा रस्ता मंजूर असून यासाठी विद्यमान आमदार राहुल कुल यांनी(३) तीन कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे,आणि प्रत्यक्षात कामाला सुरुवात देखील मागील सहा महिन्यापासून झाली असून,सदरचे काम हे अतिशय निकृष्ट दर्जाचे चालू असल्याचे येथील ग्रामस्थांनी सांगितले या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आणि ठेकेदार यांची मिली भगत असल्याने हे काम निकृष्ट दर्जाचे चालू आहे असे येथील ग्रामस्थांनी बोलून दाखवले.



एवढा मोठा निधी आमदार राहुल कुल यांनी देऊन देखील सदरचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे असल्याने येथील ग्रामस्थांनी प्रचंड नाराजी व्यक्त केली,जनतेच्या सुख सुविधांसाठी आलेला हा निधी अधिकारी आणि ठेकेदार यांच्याच फायद्याचा ठरत आहे असे येथील ग्रामस्थांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. संबंधित ठेकेदाराने जुन्या डांबरी रस्त्यावरच खोदाई न

> “ सध्या सुरू असलेले काम अतिशय निकृष्ट दर्जाचे असून संबंधित ठेकेदाराने इस्टिमेट प्रमाणे काम करून कामाचा दर्जा चांगला राखला पाहिजेत.
>
> **–सौ.ललीता सोपान चोपडे उपसरपंच राजेगाव.**

> “ संबंधित काम हे अजून पूर्ण झालेले नसून उखडलेला रस्ता हा ठेकेदारा कडून दुरुस्त करून घेतला जाईल.
>
> **–श्री.शशी तुपे शाखा अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग दौंड.**

करताच मोठमोठी खडी टाकून त्याच्यावरच नविन रस्त्याचे काम केल्याने आणि डांबर अतिशय कमी प्रमाणात वापरल्याने दोनच दिवसात हा रस्ता उखडला आहे.

## देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागाच्या वतीने

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त संविधानावर सामान्य ज्ञान परीक्षाचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालय देगलूर च्या लोकप्रशासन विभागाच्या वतीने द फोरम ऑफ पब्लिक एडमिनिस्ट्रेशन प्रोफेसर्स, ऍडमिनिस्ट्रेटिव्ह, ऑफिसर्स, स्कॉलर्स यांच्या सामंजस्य करार (च.ज.ण.) अंतर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त भारतीय संविधानावर आधारित खुला सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. या परीक्षेत शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना भारतीय संविधान व त्यातील विविध तरतुदीची सविस्तर माहिती व्हावी या उद्देशाने



संविधानाचे वाचन करण्याची आवड व प्रेरणा उद्देशाने प्रस्तुत सामान्य ज्ञान परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. सामान्य ज्ञान परीक्षा दिनांक २८ मार्च २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. गरजू विद्यार्थ्यांनी या परीक्षेत सहभाग नोंदवावा या परीक्षेतील प्रश्नपत्रिका ४९ वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न व एकूण १०० गुण असतील त्यासाठी एक तास वेळ देण्यात येईल.

सामान्य ज्ञान परीक्षेत प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यास प्रमाणपत्र व भारतीय संविधान बक्षीस म्हणून देण्यात येईल. तसेच किमान ६० गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यास प्रमाणपत्र देण्यात येईल. ही परीक्षा नि:शुल्क असेल या नावीन्यपूर्ण उपक्रम सर्व विद्यार्थ्यांसाठी खुली असून देगलूर शहर व तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्रप्रमुख डॉ. बा. रा. कतुरवार डॉ. संजय देबडे व डॉ. धनराज लजडे यांच्याकडे दिनांक २५ मार्च २०२५ पर्यंत नाव नोंदणी करावे असे आव्हान प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी केले आहे.

# यश इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे शनिवारी वार्षीक स्नेहसंमेलन; कार्यक्रमास उपस्थित राहावे-विलास खाडे

## बीडचे सिव्हिल सर्जन डॉ.अशोक थोरात यांच्या हस्ते उद्घाटन तर कै.रामभाऊ आण्णा खाडे संस्थेचे अध्यक्ष प्रदिप खाडेची उपस्थितीत लाभणार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

कै.रामभाऊ आण्णा खाडे संस्थेच्या संगम फाटा दिंद्रुड येथील यश इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवार दि. २९ एप्रिल रोजी वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित केले असुन या संमेलनास पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संचालक विलास खाडे व यश इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य व शिक्षक वृंद यांनी केले. यश इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलनाचे शनिवार दि.२९ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटक म्हणून बीड चे सिव्हिल सर्जन डॉ. अशोक थोरात तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव तथा कै.रामभाऊ आण्णा खाडे संस्थेचे अध्यक्ष प्रदिप खाडे व प्रमुख उपस्थितीत अबाजोगाईचे प्रचार्य विक्रम सारक,



उद्योजक सुरेश नाना फड, दिंद्रुड पो.स्टे.चे एपीआय खोडेवाड, विनायक कन्स्ट्रक्शन, अंबाजोगाचे मनोज गीते, डी.बी. क्षीरसागर (सहाय्यक संचालक), श्री. दादासाहेब मुंडे (सामाजिक कार्यकर्ते), लक्ष्मण बारगजे (जिल्हा निरीक्षक) हे उपस्थितीत राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. प्रदीप रोडे (संस्थापक प्रा. देवगिरी प्रतिष्ठान, बीड), साहेबराव बडे (अध्यक्ष लोकशाही विद्यालय), श्री. शिवाजीराव चाटे (प्रा. यशवंतराव चाटे शिक्षण संस्था, कैज), श्री. राजाभाऊ चाटे (प्रा. राजवैभव सेवाभावी संस्था, केज), जनकराव उबाळे (पूर्व जनकल्याण सेवाभावी संस्था, सिरसाळा), अजय चाटे (गजानन विद्यालय प्रसारक मंडळ केज), अनंत धुमाळ (प्री गुरुकुल पब्लिक स्कूल. तेलगाव), बाळासाहेब राठोड (कृष्णकेसरी सेवाभावी संस्था धारूर), सचिन सानप (गणेशानंद शिक्षण संस्था) आदींची उपस्थिती लाभणार आहे. दरम्यान वार्षिक स्नेहसंमेलन या कार्यक्रमास शिक्षणप्रेमी नागरिक, विद्यार्थी व पालक तसेच नागरिकांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आपल्या स्कुलचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला. तरी आपण सह–कुटुंब सहपरिवार उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी व विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी व मान्यवरांचे प्रेरणादायी मार्गदर्शन ऐकण्यासाठी आपण आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन संचालक विलास खाडे व यश इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य व शिक्षक वृंद यांनी केले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904